सकाळ

# पोलिसांमुळे महिलेला मिळाली लाखमोलाची बॅग

**खडकी, ता.१० :** लोकलमध्ये राहिलेली बॅग रेल्वे पोलिसांच्या तत्परतेमुळे संबंधित महिलेला परत मिळाली आहे. या बॅगेमध्ये साडेतीन लाखांचे दागिने, आधार कार्ड, पॅन कार्ड, पासपोर्ट आदी महत्त्वाची कागदपत्रे होती. ती परत मिळाल्याने महिलेने पोलिसांचे आभार मानले आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिला सोमवारी (ता. ६) सायंकाळी गर्दीच्या वेळी लोकल पकडण्याच्या प्रयत्नात होती. प्रथम श्रेणीच्या डब्यात चढण्यात ती यशस्वी झाली, मात्र बसण्यासाठी जागा मिळण्याची शक्यता नसल्याने आणि धक्काबुक्कीला वैतागून तातडीने परत खाली उतरण्याचा निर्णय घेतला. तेवढ्यात गाडी सुरू झाली आणि घाईगडबडीत उतरलेल्या महिलेची बॅग मात्र डब्यात तशीच राहिली. हा प्रकार लक्षात येताच तिने फलाटावरील पोलिसांकडे तक्रार केली. पोलिसांनीही तत्काळ पुढील स्टेशन, खडकी येथे संपर्क साधला. तेथील पोलिसांनी त्वरेने प्रथम श्रेणी डब्यात जाऊन चौकशी केली. तेथे बॅग सापडली. शिवाजीनगरचे रेल्वे पोलिस उपनिरीक्षक अमोल आंधळे आणि खडकी रेल्वे पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक आर. एन. जोशी यांच्या तत्परतेमुळे लाखमोलाची बॅग परत मिळाली. दरम्यान, प्रवाशांनी प्रवासात मौल्यवान वस्तू बाळगू नयेत. तसेच धावत्या ट्रेनमधून चढण्याचा वा उतरण्याचा प्रयत्न करू नये, अशा सूचना जोशी यांनी 'सकाळ'च्या माध्यमातून दिल्या आहेत.

Pune, AundhToday
11/01/2020 Page No. 5

Scanned by CamScanner